ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १८ | पुणें, बुधवार तारीख ३ सप्टेंबर, १९५२ | अंक १६

## विविध माहिती

**चीनकडून अधिक तांदूळ मिळणार**—भारतानें चीनकडून १,००,००० टन तांदूळ पूर्वीच्या कराराप्रमाणें घेतला आहे. तथापि चीनकडून आणखी तांदूळ देण्याची तयारी दाखविण्यांत आल्याचें समजतें. सुमारें ५०,००० टन आणखी तांदूळ चीननें देऊं केला असावा. भारतीय सरकार चीनच्या सूचनेचा विचार करीत आहे.

**नॉर्वेमधील वनमहोत्सव**— गेल्या वर्षी नॉर्वेमध्यें ३,१५,००,००० झाडें लावण्यांत आलीं. ह्या वर्षी ३·७ कोटी नवीं झाडें लावण्याचें ठरविण्यांत आलें आहे. नॉर्वेच्या जंगलखात्याचें एवढ्यावरच समाधान होत नसून पुढील वर्षी ४,२०,००,००० आणि १९५४ मध्यें ५,००,००,००० झाडें लावण्याचा त्यांचा इरादा आहे. नॉर्वेचीं जंगलें त्याच्या उत्पन्नाची एक मोठी बाब आहे.

**हैद्राबादला तांत्रिक शाळा**— हैद्राबाद सरकारनें सिकंदराबाद येथें तांत्रिक शिक्षणाची शाळा उघडण्यास मंजुरी दिली आहे. इमारत व उपकरणें ह्यांसाठीं ५,५०,००० रुपये प्राथमिक खर्च येईल. त्याशिवाय दरवर्षी १,५०,००० रुपये खर्च करावे लागतील. तरुण विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षण देण्याचा शाळेचा हेतु आहे.

**इंदूर येथील विजेचें केंद्र**— इंदूरपासून ८० मैलांवर असलेल्या महिदपूर ह्या गांवीं मध्यभारतामधील पहिलें वीज-केंद्र बांधण्यांत आलें आहे. त्याचें उद्‌घाटन नुकतेंच झालें. ह्या केंद्रामुळें ७ खेड्यांना व इंदूरला विजेचा पुरवठा होईल. मध्यभारतांत आणखी तीन ठिकाणीं विजेचीं केंद्रें बांधण्यांत येत आहेत.

**विमानांच्या तबेल्याची विक्री**—कराची येथें आशिआमधील सर्वांत मोठा विमानांचा तबेला १९३२ सालीं बांधण्यांत आला होता. तो ८५० फूट, लांब, २३० फूट रुंद आणि २०० फूट उंच आहे. १९३२ सालीं 'आर १०१' नांवाचें बलून बांधण्यांत आलें होतें. तें ठेवण्यासाठीं तो मुद्दाम बांधण्यांत आला होता. सध्यां ह्या इमारतींत एका विमान-कंपनीचें वर्कशॉप आहे. कंपनीनें आतां इमारत विकण्याचें ठरविलें आहे.

**अमेरिकेंत अन्नाच्या किंमती वाढल्या**—गेल्या महिन्यांत अमेरिकेंतील अन्नधान्याच्या किंमती १९३५ ते ३९ च्या सरासरीच्या मानानें १९०·८ टक्के वाढलेल्या आढळून आल्या. ह्या पूर्वी १९५२ च्या जानेवारींत त्या १८९·१ टक्केपर्यंत वाढल्या होत्या. १९५० च्या जूनमध्यें कोरिआंतील युद्ध सुरू झाल्यावर ज्या किंमती होत्या त्यापेक्षां आजच्या १२ टक्क्यांनीं अधिक आहेत.

**विड्याच्या पानांची निर्यात**— पूर्व पंजाबांतून प. पंजाबांत म्हणजे पाकिस्तानांत रोज सुमारें २०,००० रुपयांचीं विड्याचीं पानें निर्यात होतात. लाहोरमधील विड्याच्या पानाच्या व्यापाऱ्यांनीं विड्याचीं पानें पूर्व-पाकिस्तानांतून आणण्याचा विचार आतां चालविला आहे. भारताकडील आयातीमुळें पाकिस्तानच्या परदेशीय हुंडणावळीवर फार ताण पडत आहे असें समजतें.

**रशियांत भारत-विषयक बोलपट**—'भारतांत' हा हिंदविषयक रंगीत अनुबोधपट हल्लीं रशिआंत दाखविला जात आहे. तो बराच लोकप्रिय झाल्याचें समजतें. मॉस्को शहरांत हा चित्रपट ५ लाखांपेक्षां अधिक प्रेक्षकांनीं पाहिला. मुंबईला भरलेल्या आंतरराष्ट्रीय चित्रपट उत्सवाच्या वेळीं आलेल्या रशिअन तंत्रज्ञांनीं तो तयार केला आहे.

**पंजाब सरकारला मदत**— भारतीय सरकारच्या पुनर्वसाहत खात्यानें १९५२-५३ सालासाठीं पं. सरकारला २ कोटी, ७९ लाख रुपये मंजूर केले आहेत, असें समजतें. ह्या रकमेपैकीं १ कोटी रुपये चांदीगड योजनेसाठीं वापरण्यांत येतील. पंजाबच्या ह्या नव्या राजधानीच्या उभारणीसाठीं ह्यापूर्वी २ कोटी रुपये देण्यांत आले आहेत.

**परकीय विद्यार्थ्यांना जपानच्या शि[illegible]**— [illegible]ील वर्षापासून दरवर्षी ४६ परकीय विद्यार्थ्यां[illegible] येन शिक्षण घेण्यासाठीं जपानी सरकार शिष्यवृत्त्या देणार आहे. ह्या खर्चासाठीं तेथील शिक्षण-खात्यानें २,३४,००० रुपये मंजूर केले आहेत. विद्यार्थ्यांना फक्त जाण्यायेण्याचा खर्च करावा लागेल. प्रत्येक विद्यार्थ्याला खर्चासाठीं दरमहा २९० रुपये देण्यांत येतील.

**पंजाबांत दंतवैद्यकाचें कॉलेज**—पंजाब सरकारनें ऑक्टोबर, १९५२ पासून अमृतसर येथें एक दंतवैद्यकीय कॉलेज उघडण्याचें ठरविलें आहे. प्रारंभ म्हणून कॉलेजांत १२ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यांत येईल; अभ्यासक्रम चार वर्षांचा आहे. अभ्यासक्रम संपल्यावर पंजाब विद्यापीठातर्फे यशस्वी विद्यार्थ्यांना पदव्या देण्यांत येतील.

**मरहूम बर्नार्ड शॉ ह्यांचा फटका**—ब्यूनॉस एअर्स येथील एका प्रकाशकानें जॉर्ज बर्नार्ड शॉ ह्यांचीं २३ पुस्तकें अनधिकृतरीत्या विकण्यास ठेवलीं होतीं. शॉ ह्यांचे वकील ह्यांनीं त्याच्याकडून १४,८०० पेसॉस अथवा १,०७३ पौंड नुकसानभरपाई दाखल मागितले आहेत.

## चीन व रशिआ ह्यांच्यामधील वाटाघाटी

सध्या चिनी सरकारचें एक मोठें प्रतिनिधिमंडळ मॉस्को येथें वाटाघाटींसाठी गेलें आहे. उभयतां राष्ट्रांच्या दरम्यान राजकीय स्वरूपाच्या वाटाघाटी होतीलच; पण कांहीं बाबतींत महत्त्वाची आर्थिक सल्लामसलतही होईल अशा वार्ता आहेत. ता. ५ आक्टोबरला सो. रशिआच्या १९५१–५५ च्या नव्या पंचवार्षिक योजनेला देशांतील कम्युनिस्ट पक्ष मान्यता देणार आहे. त्याच सुमारास चिनी शिष्टमंडळ मॉस्कोला असावें हें सूचक समजण्यांत येत आहे. १९५० मध्यें रशिआ व चीन ह्यांच्यामध्यें झालेल्या करारप्रमाणें चीन चँगचुन-रेल्वे, पोर्ट ऑर्थर आणि पोर्ट डायरेन ह्यांचा उपयोग करण्याची सवलत रशिआला मिळालेली आहे. करारप्रमाणें चालू वर्षाखेर रशिआला ह्या सवलती सोडाव्या लागतील. पण चीनच्या लवकरच जाहीर होणाऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणावर मदत करण्याच्या अटीवर चीनवरील सवलतींची मुदत वाढविण्यास तयार असल्याचें समजतें. चीनच्या औद्योगीकरणासाठी रशिआकडून दीर्घ कालपर्यंत आर्थिक मदत होणें अगत्याचें आहे. ती मदत योग्य वेळीं व योग्य प्रमाणांत न आल्यास चीनला आपला औद्योगीकरणाचा कार्यक्रम लांबणीवर टाकावा लागेल आणि अंशतः बदलावा लागेल. रशिआ ही मदत कोठवर देऊं शकेल ह्याविषयीं मात्र शंका व्यक्त करण्यांत येत आहेत. रशिआचा नवीन कार्यक्रम नुकताच जाहीर झाला असला तरी त्याची प्राथमिक अंमलबजावणी गेले दीड वर्ष तरी चालू आहेच. ह्या नव्या कार्यक्रमांत १९५०–५५ ह्या कालांत औद्योगिक उत्पादनांत एकूण ७० टक्के वाढ करण्याचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें आहे. हें उद्दिष्ट साध्य करून शिवाय चीनला मोठ्या प्रमाणावर मदत कशी करतां येईल हाच प्रश्न आहे.

---

## साबणाचा धंदा– मागणी उतरली

उत्पादनक्षमता भरपूर असूनहि मागणीच्या अभावीं उत्पादन कमी करण्याची पाळी हिंदी साबण कारखानदारांवर आली आहे. घरगुती प्रमाणावर साबण करणारांना तर धंदा बंद करावा लागत आहे. २,५६००० टनांची उत्पादनक्षमता आहे, पण खप १,००,००० टनांहिनाहीं. ८ नांतील दर माणशीं साबणाचा खप १२ औंस आहे युरोपांत १ ५ पौंड व अमेरिकेंत २५ पौंड आहे. मध्यपूर्व, पूर्व आफ्रिका आणि आग्नेय आशिया येथें हिंदी साबणाची निर्गत होण्याजोगी आहे. तेलाच्या किंमती चढीच्या राहिल्या, त्याचाहि उत्पादन कमी होण्यावर परिणाम झाला.

---

## पार्लमेंटांतील मतनोंदणी

हिंदी पार्लमेंटच्या गेल्या अधिवेशनांत एकूण १४ वेळा तपशीलवार मतमोजणी करण्यांत आली. बैठकींची संख्या व कडाक्याचे वादविवाद लक्षांत घेतां, मतमोजणी फारच थोड्या वेळा झाली, असें म्हटलें पाहिजे. अध्यक्षांच्या निवडणुकीच्या वेळीं सर्वांत ज्यास्त मतें नोंदलीं गेलीं. श्री. माळवणकरांना ३९४ व श्री. मोरे ह्यांना ५५ मतें पडलीं.

---

## ट्रॉम्बे येथील वीज कारखाना

ट्रॉम्बे येथें टाटा उभारीत असलेलें ५०,००० कि वॅ. शक्तीचें वीजकेंद्र १९५५ मध्यें वीज उत्पादन करण्यास प्रारंभ करील, असें समजतें.


**ठेवी स्वीकारण्यांत येतात**

ठेवींवर दरसाल दर शेंकडा ७½ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास ठेवीची मुदत संपण्यापूर्वी आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिसीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.

**पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड**

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,
१७२, गिरगांव रोड, मुंबई ४
टेलिफोन २२७३८ तारेचा पत्ता: 'PEDNECO' Bombay

---

**भोर स्टेट बँक लि.**

[ स्थापना : १९४४ ]

**मुख्य कचेरीः–भोर, जि. पुणें.**

शाखाः–पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७१,६०० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. श्री. बा. ग. धंडुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.
दराबाबत समक्ष चौकशी करावी.
पुणें कचेरीः–बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.
अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी
ॲ. मॅनेजर.




# अर्थ

बुधवार, ता. ३ सप्टेंबर, १९५२



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

## नियंत्रणें दूर करतांना घ्यावयाची दक्षता

१९४८ च्या मानानें आतां धान्यावरील नियंत्रणें उठविण्यास परिस्थिति अधिक अनुकूल आहे. सरकारजवळ धान्याचा साठा बराच मोठा असल्याकारणानें, कोठेंहि तीव्र टंचाई निर्माण झाल्यास ती दूर करण्याचें साधन उपलब्ध आहे. धान्याच्या आयातीचें मान कायम राहिलें, तर धान्याचा सांठाहि मोठा टिकूं शकेल. युद्धकालीन नियंत्रणें बसविण्यांत आलीं, त्यापूर्वीच्या वर्षांपेक्षां आतां दर माणशीं उपलब्ध असलेल्या धान्याची परिस्थिति अधिक वाईट नाहीं—अंतर्गत उत्पादन आणि आयात हीं दोन्हीं अर्थात् विचारांत घेतलीं पाहिजेत. आयात धान्याची किंमत एकसारखी वाढत चालली आहे आणि बाजारांतील धान्याच्या किंमतींचें प्रमाण उतरतें दिसत आहे, त्यामुळें आज प्रत्यक्ष द्यावी लागणारी किंमत ( नियंत्रित व काळ्या बाजारांतील किंमत ह्यांची सरासरी ) आणि नियंत्रणें दूर केलीं तर प्रभावी होणारी किंमत ह्यांतील तफावत कमी कमी होत आहे. रोजगार आणि मिळकत ह्यांचा सर्वसाधारण कल लक्षांत घेतां, नियंत्रणें दूर केल्यावर मागणीचा पुरवठ्यावर १९४८ च्या मानानें कमीच ताण पडेल अशी अपेक्षा आहे. अशी सर्वसाधारण परिस्थिति असली, तरी प्रत्येक राज्यसरकारनें स्वतःच्या राज्यांतील परिस्थितीचा विचार करूनच नियंत्रणें दूर करावयाचीं किंवा काय, आणि तीं कितपत दूर करावयाचीं हें ठरविलें पाहिजे, असा इशारा टाटा क्वार्टर्लीनें दिला आहे.

नियंत्रणें नसण्यापेक्षां तीं असणें केव्हांहि बरें, अशी एक विचारसरणी आहे. तूट भरून निघण्यासाठी आवश्यक तें सर्व करतां आलें, तर नियंत्रणांत कांहींतरी अर्थ आहे. मार्च, १९५२ पूर्वी धान्याच्या बाबतींत स्वयंपूर्ण होण्याची घोषणा हा नियंत्रणाच्या कल्पनेच्या विस्ताराचाच एक भाग होता. धान्य–उत्पादनास कांहीं काळ प्राधान्य देण्यांत आलें तें टिकाऊ ठरलें नाहीं आणि इतर कित्येक दुसऱ्या योजनांकडे राज्य सरकारांना लक्ष द्यावें लागलें. मध्यवर्ती सरकारनें सबसिडीचें प्रमाण कमी केलें, ह्याचें कारण पंचवार्षिक योजनेसाठी त्यास पैसा हवा होता. पंचवार्षिक योजना यशस्वी करतांना, अन्नाचा दर माणशीं किमान खप आणि किंमतींची स्थिरता ह्याबाबतींत लवचीकपणा निर्माण झाला तरी चालेल, अशी भारत सरकारनें अप्रत्यक्ष कबुली दिली आहे. अशा परिस्थितींत, नियंत्रणें व सबसिडी ह्यांच्या द्वारां किंमती मर्यादेंत राखाव्यात किंवा नियंत्रित जिनसांची यादी वाढवून अन्नावरील नियंत्रण अधिक प्रभावी करावें, ह्या म्हणण्यास वास्तवतेचा आधार मिळत नाहीं, असा निष्कर्ष निघतो.

**अन्नधान्य नियंत्रणाच्या धोरणास मिळावें तितकें यश लाभलें नाहीं, म्हणून केवळ नियंत्रणें दूर करणें श्रेयस्कर होणार नाहीं. त्या बाबतींत अत्यंत काळजीपूर्वकच आणि पायरी-पायरीनें पाऊल टाकलें पाहिजे, असा महत्त्वाचा इशारा टाटा क्वार्टर्लीनें दिला आहे. उदाहरणार्थ, प्रत्येकास कांहीं किमान धान्य तरी** नियंत्रित किंमतीस उपलब्ध होत राहील अशी काळजी घ्यावी लागेल. सक्तीची धान्यवसुली कमी करून, शेतकऱ्याला त्याचेजवळील जादा धान्य कोठेंहि विकण्यास मुभा ठेवावी लागेल. नियंत्रणें दूर करण्याची योजना अंमलांत आणतांना, धान्याची आयात अजिबात बंद करण्याची कल्पना आपल्या मनांतून काढून टाकली पाहिजे. मोठ्या प्रमाणावरील आयात चालू राहिली तरच नियंत्रणें दूर करणें सोपें जाईल. किंमत व उठाव ह्यावरील नियंत्रणें दूर केलीं, तरी पैशाबाबत व करविषयक तरतुदी कायमच ठेवल्या पाहिजेत. तुटीचीं अंदाजपत्रकें आखून व पार पाडून किंवा रोखे बाजाराला उचलून धरण्यासाठी पैसा स्वस्त करावा लागला, तर चलनविस्ताराचें डोकें पुनः वर निघाल्याविना रहाणार नाहीं. सध्याच्या किंमतीच्या मानाचा व उपलब्ध मालाचा विचार करतां, समाजाचा त्यावरील खर्च भरमसाट होऊं देतां कामा नये, ह्याचाच अर्थ फाजील पैसा थोड्या मालाच्या शोधार्थ जाऊं देतां कामा नये. म्हणजे, पैशाचा पुरवठा मर्यादेंत राखण्यांत आला पाहिजे. धान्याचें उत्पादन वाढविण्यास सहाय्यभूत होतील, अशा अल्पकालीन योजनांसाठी मध्यवर्ती व राज्यसरकारांनीं सध्यापेक्षां कितीतरी ज्यास्त पैसा खर्च केला पाहिजे. नियंत्रणें दूर करतांना कोणत्या प्रकारची सर्वांगीण दक्षता घेतली पाहिजे, ह्याची योग्य जाणीव धोरण आंखणाऱ्या जबाबदार मंत्र्यांना सतत राहील अशी अपेक्षा करणें योग्य होईल.

---

## आयात धान्यानें भरलेलें आगबोटींचें भाडें

१९५१–५२ मध्यें भारतानें अन्नधान्य आयात केलें, त्याप्रीत्यर्थ आगबोट कंपन्यांना ५०·८ कोटी रु. वहातुकीचें भाडें द्यावें लागलें. त्यांपैकीं हिंदी कंपन्यांना फक्त १·६४ कोटी रुपये मिळाले, त्याची वाटणी अशीः—

| | | | |
|---|---|---|---|
| सिंधा | ८९·८ लक्ष रु. | | |
| ईस्टर्न शिपिंग | २३·२७ ,, ,, | ग्रेस्ट ईस्टर्न | [illegible] लक्ष रु. |
| भारत लाइन्स | १९·३६ ,, ,, | बॉंबे स्टीम नॅ. | ८·१६ ,, ,, |

धान्याची आयात व तिचेप्रीत्यर्थ झालेला वहातुकीचा खर्च खालीं दिला आहेः—

| वर्ष | लक्ष टन | आयात किंमत ( कोटी रु. ) | आगबोट भाडें (कोटी रु.) हिंदी कंपन्यांना | आगबोट भाडें (कोटी रु.) विदेशी कंपन्यांना |
|---|---|---|---|---|
| १९४६ | २२·५ | ७६·१ | ०·१६ | १४·७ |
| १९४७ | २३·३ | ९४·० | ०·८५ | १४·४ |
| १९४८ | २८·४ | १२९·७ | १·३५ | १४·२ |
| १९४९ | ३७·१ | १४४·३ | ०·६६ | १३·५ |
| १९५० | २१·३ | ८०·६ | ०·५० | ७·८ |
| १९५१ | ४७·३ | २१६·४ | १·४८ | ३८·७ |

गेल्या वर्षीं, वहातुकीच्या भाड्याचें आयात धान्याच्या किंमतीशीं प्रमाण १८·७% पडलें. १९५० व १९५१ ह्या मुदतींत आयातींत १२०% वाढ झाली, पण भाडें जवळ जवळ चौपट झालें.

## भाडें-नियंत्रण कायद्याच्या अंमलबजावणीचें परीक्षण


( श्री. वि. भाडभोंट, एम. ए., एलएल बी. )

भाडेनियंत्रण कायद्याची अंमलबजावणी कशी चालली आहे व त्याची उपयुक्तता अद्याप आहे कीं नाहीं हें पहाण्याकरतां सरकारनें एक भाडेनियंत्रण कायदा समीक्षक समिति नेमली आहे. त्यावर मुंबईच्या घरमालक संघाचे श्री. दाभोळकर यांची नेमणूक झालेली दिसते. परंतु मुंबई, अहमदाबाद, अगर पुणें या शहरांतून आज कित्येक वर्षे काम करीत असलेल्या घरभाडेकरू संघांतून कोणाची नेमणूक झाल्याचें दिसून येत नाहीं. समितीचे अध्यक्षही जे नेमले आहेत ते पुणें, मुंबई, अहमदाबाद यासारख्या मोठ्या शहरांतले नाहींत. नाशिक-सारख्या ठिकाणीं घरमालक व भाडेकरूंचे संबंध फारच निराळ्या प्रकारचे असूं शकतात. त्या ठिकाणीं भांडवलशाही पिळणूक कमी. मालकांकडून भाडेकऱ्यांना होणाऱ्या त्रासांचें स्वरूप भिन्न व एकंदर तीव्रताही कमी. पुणें–मुंबईसारख्या शहरांत घरमालकानें वीज व पाणी तोडलें म्हणजे कशी असहाय्यता निर्माण होते याची त्यांना जाणीव त्या मानानें कमी. या सर्व दृष्टीनें यापुढें कोणत्याही कायद्याच्या अंमलबजावणीचें परीक्षण करण्याकरतां जेव्हां जेव्हां समित्या नेमल्या जातील तेव्हां तेव्हां त्यां विषयाचा अभ्यास करणाऱ्या संघांतून अगर संस्थांतून प्रतिनिधींची नेमणूक केल्यास व्यवहारांत आलेल्या अडचणी सामर्थ्यानें कळण्यास मदत निश्चित होईल. केवळ विधिमंडळाचें सभासदत्व ही त्याची कसोटी असूं नये.

आतां ही समिति नेमली आहे. तेव्हां या समितीनें तरी ठिक-ठिकाणीं काम करणाऱ्या घरभाडेकरू संघांच्या प्रतिनिधींना बोल-वून त्यांचें म्हणणें ऐकून घेऊन आपला अहवाल सादर करावा म्हणजे तो तावढतोव कार्यवाहींत येण्यास अडचण पडणार नाहीं.

समितीपुढें जे अनेक प्रश्न सोडविण्याकरितां दिले आहेत त्यांतील एक म्हणजे कायद्याची मुदत किती वाढवावी हा आहे. याबाबत आमच्या परिषदेनें वारंवार ठराव करून हा कायदा कायमच करावा अशी सरकारकडे विनंति केली आहे व तीच मागणी यापुढें करावी लागेल. या कायद्यांत मालकांना मिळणाऱ्या भाड्याची पूर्ण सोय केलेली [illegible]ल्यामुळें हा कायदा चालूं ठेवण्यानें कोणावरही अन्याय होणार [illegible]. ज्या शहरांतून जागांची टंचाई आहे त्याच ठिकाणीं या कायद्या[illegible] खरा उपयोग आहे. इतर ठिकाणीं मालक–भाडेकरी यांचे [illegible] भांडण उपस्थित झाल्यास भाडेकरी दुसरीकडे जागा पाहून मोकळा होतो. कायद्याचें संरक्षण अनिर्वाहपक्षींच मनुष्य घेतो. तोंपर्यंत करार व समजुतीं यावरच तो आपले व्यवहार करीत असतो. अद्यापही पुण्यासारख्या शहरांत भाडेंनियं-त्रणाचे अर्ज रोजचे रोज होत आहेत व ४५ रु. वरून ५ रु. वर भाडें येत आहे. या एका गोष्टीवरूनसुद्धां या कायद्याची उपयुक्तता पटण्यासारखी आहे.

भाडेकरूंपुढील बरेचसे प्रश्न सोडविण्याचें दृष्टीनें नगरपालि-कांची मदत भाडेकरूंना चांगली होते. ती मदत जास्त सुलभ मिळावी म्हणून भाडेकरूंचे प्रतिनिधी नगरपालिकांतून निवडून जावयास पाहिजेत परंतु अजूनही आपल्याकडे गरिबांचें प्रति-निधित्व श्रीमंतांकडे आहे त्यामुळें ही गोष्ट अद्याप शक्य होत नाहीं. अर्थात् त्याचे जे परिणाम व्हावयाचे तेच होतात व मुंबईच्या नगरपालिकेंत भाड्यांत १० टक्क्यांची वाढ करण्यास सवलत दिली जाते तर पुणें नगरपालिकेंत डिस्ट्रेस वॉरंटाची शिफारस केली जाते.

SAVE to help yourself and the NATION
WITH THE

HOME SAFE
THE SARASWAT CO-OPERATIVE BANK LTD.
GIRGAON, BOMBAY.
Branches: Dadar, Mahim, Poona & Belgaum

### ब्रिटनचें पोलादाचें उत्पादन

ब्रिटनच्या लोखंडाच्या व पोलादाच्या उत्पादनासंबंधीं एक अहवाल नुकताच प्रसिद्ध करण्यांत आला आहे. ह्या अहवालांत सदरच्या धंद्याविषयीं एका पंचवार्षिक कार्यक्रमाची रूपरेखा देण्यांत आली आहे. तीप्रमाणें ब्रिटनमधील लोखंडाचें उत्पादन दरवर्षी १,५०,००,००० टन व पोलादाचें उत्पादन दरवर्षी २,००,००,००० पर्यंत करण्याची व्यवस्था होईल. उत्पादन-वाढीची ही योजना अंमलांत आणण्यासाठीं कच्च्या मालाची तरतूद अधिक प्रमाणांत करावी लागणार आहे. आफ्रिकेंत लोखंडाच्या मातीसाठीं शोध सुरू करण्यांत आला आहे. त्याच प्रमाणें ह्या उद्योगधंद्यांना लागणारा कोळसा कसा मिळवितां येईल ह्यासंबंधीं विचार करण्यांत येत आहे. सध्या जितका कोळसा लागतो त्याच्यापेक्षां तो दरवर्षी ७०,००,००० टन अधिक कसा मिळविता येईल ह्याचा नॅशनल कोल बोर्ड विचार करीत आहे. त्याशिवाय लोखंड व पोलादाच्या जादा निर्मितीसाठीं बरेंच भांडवलही गुंतवावें लागणार आहे. अमेरिकेच्या पोलादाच्या कारखान्यांतील उत्पादन–पद्धतीचें परीक्षण करण्यासाठीं ब्रिटिश व अमेरिकन तज्ज्ञांचें एक कौन्सिल नेमण्यांत आलें होतें. कौन्सिलला असें आढळून आलें कीं, ब्रिटनमध्यें दरवर्षी दर कामगारामागें अवघे १,२४१ टन पोलाद निर्माण होतें. अमेरिकेंत तें २,३०६ टन इतकें निर्माण होतें. ह्याचें प्रमुख कारण म्हणजे अमेरिकन कारखान्यांचा विस्तार हें आहे. म्हणून अमेरिकन कारखान्यांच्या पद्धतीचे मोठे कारखाने स्थापन करण्यांत यावे अशी सूचना कौन्सिलनें केली आहे. तथापि, ब्रिटननें आपलें पोलादाचें उत्पादन इतकें वाढवावें किंवा नाहीं ह्याविषयीं मतभेद दिसून येत आहे. गेल्या दोन वर्षांत जगांतील पोलादाच्या वार्षिक उत्पादनांत ३,५०,००,००० टनांची वाढ झालेली आहे. त्याशिवाय ब्रिटिश साम्राज्यांतील पूर्वीचे देश, प. युरोप आणि अमेरिका इत्यादि भूभागांत अधिक पोलाद उत्पादन करण्याच्या योजना आंखण्यांत आल्या आहेत. सध्या ब्रिटिश पोलादाचें जितकें उत्पादन आहे त्यापेक्षां मागणी बरीच अधिक आहे हें खरें; पण ही परिस्थिति भांडवलाची नियंत्रित गुंतवणूक आणि जागतिक व्यापारावर असणारें कडक नियंत्रण ह्यांच्यामुळें उत्पन्न झालेली आहे. ती कांहीं कायमची टिकणारी नाहीं. परिस्थितींत पालट झाल्यावर ब्रिटनच्या पोलादाला सध्यां इतकी मागणी कायम राहीलच, असें हमखास सांगतां येत नाहीं.

### ब्रह्मदेशचें नाविक दल

ब्रह्मदेशाच्या नाविक दलानें जपानकडून ७० बोटी बांधवून घेण्याचें ठरविलें आहे, असें समजतें. पाकिस्तानही जपानकडून कांहीं बोटी घेण्याचा संभव आहे.

## डेक्कन बँक्स असोसिएशनला डॉ. जिवराज मेथा ह्यांची भेट

डेक्कन बँक्स असोसिएशनला नामदार डॉ. जीवराज मेथा यांनीं ता. २३ ऑगस्ट रोजीं भेट दिली. त्यावेळीं बँक ऑफ महाराष्ट्र, पूना इन्व्हेस्टर्स लि., डेक्कन इन्व्हेस्टर्स लि., बुधगांव बँक, प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक, बँक ऑफ पूना, भारत इंडस्ट्रिअल बँक, भोर स्टेट बँक इत्यादी बँकांचे मॅनेजर व चेअरमन, श्री. धोंडूमामा साठे, श्री. ग. रा. साठे, श्री. दादासाहेब शेंबेकर, श्री. माणिकचंद वीरचंद, शेट मुरलीधर चतुर्भुज लोहिया, श्री. काकासाहेब शिंगरे, श्री. साळवेकर, श्री. देशपांडे वगैरे या धंद्यांतील प्रमुख लोक उपस्थित होते. अध्यक्षांनीं मंत्र्यांचें स्वागतपर भाषण केल्यानंतर डेक्कन बँक्स् असोसिएशनच्या कांहीं सभासदांनीं आपल्या अडचणी व सूचना नामदारसाहेब यांचेपुढें मांडल्या. त्यानंतर अर्थमंत्रि यांनीं आपल्या भाषणांत डेक्कन बँक्स् असोसिएशनला भेट देण्याची संधि मिळाल्याबद्दल व अशा प्रकारची एक संस्था काढून डेक्कन मधील बँकांनीं संघटण केल्याबद्दल समाधान व्यक्त केलें व केलेल्या सूचनांचा जे माझेकडून होण्यासारखें असेल तें करण्याचें आश्वासन दिलें. त्याचवेळीं बँकांच्या प्रश्नासंबंधीं अधिक विचार-विनिमय रिझर्व्ह बँकेकडून करून घ्यावा अशी त्यांनीं सूचना केली. रिझर्व्ह बँक अगर मध्यवर्ति सरकारकडे आपल्या अडचणी कळवितांना मुंबई सरकारमार्फत पाठवितांना मी योग्य शिफारस करीन. ना. अर्थमंत्रि यांचे भाषणानंतर संघाचे सेक्रेटरी श्री. काकासाहेब शिंगरे यांनीं आभार मानल्यावर सभेचें काम संपलें.

अध्यक्ष, श्री. धो. कृ. साठे (बँक ऑफ महाराष्ट्र लि. चे चेअरमन) ह्यांच्या भाषणांतील महत्त्वाचा भाग खालीं दिला आहे.

"दिवसेंदिवस आर्थिक परिस्थितींत झपाट्यानें बदल होत आहे व त्यामुळें बँकांना आपले व्यवहार फारच जपून करावे लागतात. असें असलें तरी एकंदरींत डेक्कनमधील बँकांची कार्यपद्धति व मजबुती चांगल्या प्रकारची आहे असें आम्हींच म्हणतों असें नव्हे तर माजी अर्थमंत्रि नामदार वैकुंठलाल मेथा यांनींही आपल्या भेटींत असाच अभिप्राय व्यक्त केला होता.

"लोकांमध्यें बँकांची उपयुक्तता पटवून देण्यासाठी व लोकांनीं बँकांचा जास्तींत जास्त फायदा घ्यावा यासाठी सरकारकडून कांहीं प्रचार व्हावा अशी आम्ही अपेक्षा करतों. अलीकडे लहान-मोठ्या चोऱ्यांचें प्रमाण विशेषतः शहरांतून वाढत आहे, व त्यांत बरीच रकम घरींच ठेवल्यानें लोकांचें नुकसानही झालें आहे. कमींत कमी पैसे घरीं ठेवून बाकीचे पैसे बँकांतून ठेवल्यास अशा चोऱ्यामाऱ्यांमुळें आर्थिक नुकसान कमी होईल याची जाणीव लोकांना जितक्या लवकर होईल तितकी झाली पाहिजे. जनतेच्या हितासाठी व लोकांच्या रकमेच्या सुरक्षितेसाठीं बँका असतात हें लोकांच्या अजून लक्षांत आलें नाहीं."

## ब्रिटिश बँक ऑफ दि मिडल ईस्ट

इंपीरिअल बँक ऑफ इराणचें ब्रिटिश बँक ऑफ दि मिडल ईस्ट मधील रूपांतर पुरें झालें आहे. इराणमधील व्यवहार बँकेनें बंद केले आहेत. इराणमधील बँकेची मालमत्ता विकून टाकण्यांत येत आहे. बँकेनें मध्यपूर्वेतील देशांत आपलें जाळें वाढविलें आहे.

## मृत्यूंचें प्रमाण ४५% उतरलें

अमेरिकेंत १९०० मध्यें मृत्यूंचें दर हजारीं प्रमाण १७·२ होतें, तें १९५० मध्यें ९·६ पर्यंत उतरलें. आरोग्याची सुधारणा सर्व वर्गांच्या स्त्री-पुरुषांत आढळून आली.

## स्वीडन-नॉर्वेची भारताला मदत

मुंबई सरकारचे डेप्युटि डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रिज डॉ. मांडलेकर हे नुकतेंच स्वीडन, नॉर्वे आणि फिनूलंड ह्या देशांचा दौरा करून परत आले. ह्या देशांतील रसायन-विषयक उद्योगधंद्यांचा अभ्यास करण्यासाठी त्यांना संयुक्त-राष्ट्रसंघटनेतर्फे पाठविण्यांत आलें होतें. डॉ. मांडलेकर ह्यांनीं अशी माहिती सांगितली कीं नॉर्वेतील एक मोठी इलेक्ट्रो-केमिकल कंपनी म्हैसूरमध्यें लोखंडाच्या उत्पादनाचा एक कारखाना उभारीत आहे. ह्या कंपनीनें लोखंड व पोलादाच्या उत्पादनाची जी पद्धत वापरली आहे तिचा उपयोग केल्यानें म्हैसूर संस्थानांत सांपडणाऱ्या लोखंडाच्या मातीचाच उपयोग करतां येईल आणि शिवाय लोखंड गाळण्यासाठीं जरूर त्या कोळशाचाही उपयोग करावा लागणार नाहीं. डॉ. मांडलेकर ह्यांच्या माहितीप्रमाणें बऱ्याच भारतीय कंपन्यांनीं स्कँडिनेव्हिअन कारखानदारांकडे यंत्रसामुग्रीसाठीं विचारणा केली आहे. नागदा येथें कापडाच्या गिरण्यांत वापरण्यांत येणाऱ्या कापसांत मिसळण्यासाठीं एक प्रकारचा तंतुमय पदार्थ तयार करण्याचा एक कारखाना काढण्यांत येत आहे. हा कारखाना आणखी दोन वर्षांनीं उत्पादन करूं लागेल आणि मग भारतीय गिरण्यांची 'स्टेपल फायबर' ची बरीचशी गरज देशांतच भागू शकेल. डॉ. मांडलेकर ह्यांनीं वरील तीन देशांतील बरेच कारखाने नजरेखालीं घातले असून त्यांच्या मतानें व्हायकोज, कागद, इत्यादींच्या कारखान्यांत ज्या उत्पादनपद्धती वापरल्या जातात त्यांचा भारताला बराच उपयोग होण्यासारखा आहे. स्कँडिनेव्हिआमधील कारखानदार भारताला तांत्रिक ज्ञान व यंत्रें ह्यांची मदत करण्यासही तयार आहेत.

## सोव्हिएट रशिआंतील टेलिव्हिजन

सोव्हिएट रशिआंत टेलिव्हिजनचा अधिक प्रसार करण्याचे प्रयत्न करण्यांत येत आहेत. सैबेरिआसारख्या दूर असणाऱ्या भागांतील लोकांनासुद्धां टेलिव्हिजनवरील कार्यक्रम दाखविण्याची सोय सरकार करणार आहे. सध्यां मास्को आणि लेनिनग्रॅड शहरांतून चित्रवाणीचीं प्रक्षेपण-केंद्रें आहेत. किएव्ह ह्या शहरांत एक नवीन केंद्र उघडण्यांत येणार आहे. चित्रवाणीच्या प्रक्षेपणाची मर्यादा वाढविण्यासाठीं सूक्ष्म लघुलहरींचा उपयोग करण्यांत येत असून अथावत् यंत्रसामुग्रीही वापरण्यांत येत आहे. १९५२ च्या जानेवारी महिन्यापर्यंत मॉस्कोच्या आसपास रहाणाऱ्या ७,००० सामुदायिक शेतकऱ्यांच्या घरांत चित्रवाणीचे पडदे बसविण्यांत आले. १९५० सालीं रशिआंत टेलिव्हिजनचे जितके सेटस् तयार झाले त्याच्यापेक्षा दुप्पट १९५१ सालीं तयार झाले. चालू सालीं रशिअन लोकांना ६० टक्के अधिक टेलिव्हिजनचे सेट्स मिळूं शकतील. चित्रवाणीच्या प्रक्षेपण-क्षेत्राची मर्यादा वाढविणें आणि रंगीत दृश्यें दाखविणें ह्यासंबंधीं विशेष संशोधन करण्यांत येत आहे. हें संशोधन टेलिव्हिजन संबंधीं आवड असणाऱ्या हौशी लोकांकडून स्थानिक सरकारच्या पाठिंब्यानें होत आहे. मास्कोमधील नाट्यगृहांत होणारीं नृत्यें, खेळांच्या स्पर्धा व बोलपट चित्रवाणीवरून प्रक्षेपित करण्यांत येतात. चित्रवाणीखात्याचा सर्व खर्च सरकार चालवितें. व्यापारी पद्धतीचे कार्यक्रम दाखविण्यांत येत नाहींत. त्याचप्रमाणें जाहिरातींनाही मनाई असते. टेलिव्हिजन सेट्सची नोंद पोस्ट ऑफिसांतून केलेली असते आणि त्यांचे मालक सेट्स बाळगल्याबद्दल नाममात्र कर सरकारला देतात.

## कांहीं महत्त्वाच्या पूर्व आशियांतील देशांच्या व्यापारांत भारताचा भाग

( आकडे लक्ष डॉलर्सचे )

| देश | आयात | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १९४८. | | | १९४९ | | | १९५० | | | १९५१* | | |
| | एकूण किंमत | एकट्या भारतांतून | भारताचा वाटा % | एकूण किंमत | एकट्या भारतांतून | भारताचा वाटा | एकूण किंमत | एकट्या भारतांतून | भारताचा वाटा % | एकूण किंमत | एकट्या भारतांतून | भारताचा वाटा % |
| ब्रह्मदेश | १८०१ | ४५० | २५·० | १०१३ | ३५८ | ३५·३ | ११४२ | ४९६ | ४३·४ | ६३३ | २१८ | ३४·४ |
| सिलोन | ३००५ | ३९३ | १३·१ | २८९५ | ४१७ | १४·४ | २४५४ | ३८० | १५·५ | ३२७३ | ३९४ | १२·० |
| हॉंगकॉंग | ५२३३ | ११९ | २·३ | ६२८७ | १८८ | ३·० | ६६६८ | २९४ | ४·४ | ७७२२ | २६७ | ३·४ |
| मलाया | ८४१८ | १६४ | १·९ | ८१०० | २७१ | ३·३ | ९५२३ | ६३९ | ५·७ | १५५३८ | ६७३ | ४·३ |
| इंडोचायना | १८८१ | २२ | १·२ | २३०७ | ४९ | २·१ | २२०४ | १५ | ०·७ | १७४४ | ९ | ०·५ |
| इंडोनेशिया | ४२७५ | ९६ | २·२ | ५३६५ | १३३ | २·५ | ४०१८ | २२० | ५·५ | ६५३५ | २३९ | ३·७ |
| जपान | ६८२६ | २७७ | ४·१ | ८९९८ | १३५ | १·५ | ९६९९ | १७८ | १·८ | १८८०३ | ५७८ | ३·१ |
| फिलिपाइन्स | ५८५९ | ६६ | १·१ | ५६८७ | ५३ | ०·९ | ३४२१ | २२ | ०·६ | ४७७६ | ४० | ०·८ |
| थाइलँड | १७५४ | ३४ | १·९ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| एकूण | ३९०५२ | १६२१ | ४·१ | ४०६५२ | १६०४ | ३·९ | ३९१२९ | २२४४ | ५·७ | ... | ... | ... |

| देश | निर्गत | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १९४८ | | | १९४९ | | | १९५० | | | १९५१* | | |
| | एकूण किंमत | एकट्या भारताकडे | भारताचा वाटा % | एकूण किंमत | एकट्या भारताकडे | भारताचा वाटा % | एकूण किंमत | एकट्या भारताकडे | भारताचा वाटा % | एकूण किंमत | एकट्या भारताकडे | भारताचा वाटा % |
| ब्रह्मदेश | २२८९ | ९१२ | ३९·८ | १४२५ | ४५५ | ३१·९ | १५७५ | २८७ | २६·७ | ११५९ | २४० | २०·७ |
| सिलोन | ३०५५ | ८७ | २·८ | २९३३ | ६७ | १·६ | ३२८२ | ६३ | १·९ | ३८२८ | ९८ | २·६ |
| हॉंगकॉंग | ३९८७ | ११९ | ३·० | ५२८६ | ९१ | १·७ | ६५०२ | ४० | ०·६ | ७२६८ | ४२ | ०·६ |
| मलाया | ८१३० | २९७ | ३·७ | ७१८० | २७२ | ३·८ | १३१११ | २४८ | १·९ | १९८५१ | ३८० | १·९ |
| इंडोचायना | ९१८ | २१ | २·३ | ६७६ | — | — | ७९४ | — | — | ८३१ | — | — |
| इंडोनेशिया | ३९२१ | ७३ | १·९ | ५३४४ | ४५ | ०·८ | ७२१६ | २४ | ०·२ | १००६५ | ३३ | ०·३ |
| जपान | २५८६ | ९१ | ३·५ | ५१०७ | ६४८ | १२·८ | ८२०१ | २०३ | २·५ | १०७७४ | ३९९ | ३·७ |
| फिलिपाइन्स | ३१७८ | १८ | ०·६ | २५३८ | १८ | ०·७ | ३३७१ | ८ | ... | ४००४ | १४ | ०·३ |
| थाइलँड | २४८४ | ३६० | १४·५ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| एकूण | ३०५४८ | १९७८ | ६·५ | ३०४८९ | १५९६ | ५·२ | ४४०६० | ८७३ | २·० | ... | ... | ... |

* हे आकडे अपुरे आहेत.

**आकडेशास्त्राचें महत्त्व पटूं लागलें**— भारतीय सरकारला आंकडेशास्त्रीय सल्ला देणारे प्रो. महालनवीस ह्यांचें मुंबईला एक भाषण झालें. भारतीय सरकार आणि राज्य सरकारें आतां आंकडेशास्त्राचा अधिकाधिक उपयोग करूं लागल्याबद्दल त्यांनीं समाधान व्यक्त केलें. सरकार, अर्थशास्त्रज्ञ आणि आंकडेशास्त्रज्ञ ह्यांचें अधिक सहकार्य झालें पाहिजे असेंही ते म्हणाले.

**लघुकथेसाठी बक्षिस**—हैद्राबाद सरकारनें कविता आणि लघुकथा ह्यांच्या स्पर्धा येत्या ऑक्टोबरपासून ठेवण्याचें ठरविलें आहे. ह्या स्पर्धा तेलगू, मराठी, कानडी, हिंदी व इंग्रजी इतक्या भाषांतून ठेवल्या जातील. होतकरू लेखकांना उत्तेजन म्हणून हा उपक्रम करण्यांत येत आहे. पहिलें बक्षिस २०० रुपयांचें असून दुसरें १०० रुपयांचें आहे.

**दीपगृहांत वीज चमकणार**—मद्रास हायकोर्टाच्या इमारतीवर १८९४ सालीं बांधण्यांत आलेलें दीपगृह हें भारतामधील सर्वांत जुनें आहे. ह्या दीपगृहाची उंची १७० फूट आहे. येत्या ऑक्टोबरमध्यें दीपगृहांत विजेचे दिवे लावण्यांत येणार आहेत. हे १२ दिवे ब्रिटनमध्यें मुद्दाम तयार करविण्यांत आले असून त्यांची प्रकाश-शक्ति मोठी आहे.

**सिलोनमध्यें युरेनिअम**—कोलंबोच्या दक्षिणेला असलेल्या समुद्रकिनाऱ्यावर मोनोझाइटची वाळू सांपडली आहे. ह्या वाळूंत अणुशक्तीच्या उत्पादनाला जरूर असलेलें युरेनिअम सांपडतें. वाळूचें संशोधन करून तींत अणुशक्तीच्या उत्पादनासाठीं जरूर असलेलीं द्रव्यें किती प्रमाणांत आहेत तें पहाण्यासाठीं एका ब्रिटिश कंपनीनें जरूर ती यंत्रसामुग्री सीलोनला कर्जाऊ दिली आहे.

**होळकरांचा अमेरिकेंतील प्रासाद**—इंदूरच्या महाराजांनीं कॅलिफोर्निआंत एक प्रासादतुल्य वाडा ५ लाख डॉलर्स खर्चून बांधला होता. त्यांच्या मुलीला पळवून नेतां येऊं नये म्हणून तो फार मजबूत असा बांधण्यांत आला होता. महाराजांची घटस्फोटित बायको मार्गारिटा हिनें तो आतां २ लाख डॉलर्सना विकून टाकला आहे. महाराजांपासून झालेल्या तिच्या मुलीला तिच्याच ताब्यांत देण्यांत आलें होतें.

**इंडोचीनमधील प्राचीन शहरें**—इंडोचीनमध्यें भारतीय व्यापाऱ्यांनीं प्राचीन कालीं बांधलेल्या शहरांचे कांहीं अवशेष नुकतेच सांपडले आहे. तें निदान २ हजार वर्षांपूर्वींचे असावेत. हीं शहरें एकमेकांशीं व समुद्राशीं कालव्यांनीं जोडलेलीं होतीं असें संशोधकांचें मत आहे. अशा प्रकारचीं ४० निरनिराळीं शहरें आणि त्यांना जोडणारे ३२ कालवे त्यांना सांपडले आहेत. कांहीं शहरांना १२ मैल लांबीची तटबंदी असल्याचें आढळून आलें आहे.

**विमान कंपनीचा नफा**—बी. ओ. ए. सी. विमान कंपनीच्या कॉमेट जातीच्या विमानांचा एक मार्ग लंडन तें जोहान्सबर्ग असा आहे. ह्या फेरीवर विमान कंपनीला पहिल्या महिन्यांतच ३,००० पौंड नफा झाला. ही फेरी आठवड्यांतून तीनदां होते. त्यापैकीं एक फेरी आतां कैरोवरून जाऊं लागल्यामुळें ४५० मैल कमी अंतर कापावें लागतें.

**मद्रास सरकारला मदत**—भारत आणि अमेरिका ह्यांच्या दरम्यान झालेल्या तांत्रिक मदतीच्या कराराप्रमाणें समुद्रांतील मच्छीमारी धंद्याचा विकास करण्यासाठीं मद्रास सरकारला ५ लाख डॉलर्सची मदत मिळणार आहे. ह्या मदतीमधून ८ लाख रुपये दरवर्षी खर्च करण्यांत येणार आहेत. ३ लाख रुपये भांडवली खर्च म्हणून खर्च करण्यांत येतील.

**क्षयरोगाविरुद्ध मोहीम**—गेल्या वर्षीपासून नागपूर-जबलपूर-अमरावती भागांत क्षयरोगाविरुद्ध मोहीम काढण्यांत आली होती. तेव्हांपासून १,२३,४०० प्रौढांना आणि ४१,००० मुलांना बी. सी. जी. लस टोंचण्यांत आली. छिंदवाडा येथेंही एक डॉक्टरांची तुकडी टोंचण्याचें काम करीत आहे.

**राजे फरूक ह्यांच्या अवळील तिकिटांचा संग्रह**—इजिप्तचे माजी राजे फरूक ह्यांच्या खाजगी मालमत्तेची मोजदाद करण्यासाठीं एक कमिटी नेमण्यांत आली आहे. राजे फरूक ह्यांना निरनिराळ्या देशांचीं तिकिटें जमविण्याचा षोक होता. त्यांच्याजवळ जमलेल्या तिकिटांच्या संग्रहाची किंमत सुमारें १,६०,००,००० डॉलर्स म्हणजे सुमारें ८ कोटी रुपये आहे.

**उत्तर-प्रदेशांतील लोकरीचा धंदा**—डेहराडून जिल्ह्यांतील लोकरीच्या उत्पादनांत वाढ करण्यासाठीं उत्तर-प्रदेश सरकारनें मदत देण्याचें ठरविलें आहे. ह्या भागांत सुमारें ७५,००० मेंढ्या आहेत; परंतु त्यांच्यापासून लोकर मात्र भरपूर निघत नाहीं. तिबेटमधून येणारी लोकर बंद झाल्यामुळें सरकारनें हा उपाय करण्याचें ठरविलें.

**टांकसाळीसाठीं यंत्रसामुग्री**—अलिपूर येथें उभारण्यांत येणाऱ्या टांकसाळींत वापरण्यासाठीं चांदी गाळण्याची यंत्रसामुग्री विकत घेण्याचा करार भारतीय सरकारनें एका जर्मन कंपनीशीं केला आहे असें समजतें. युद्धाच्या वेळीं अमेरिकेकडून घेतलेली २० कोटी औंस चांदी भारताला परत करावयाची आहे. जुन्या नाण्यांतील चांदी गाळण्यासाठीं ह्या यंत्रसामुग्रीचा उपयोग करण्यांत येईल.


**बार्शी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. बार्शी.**

## —: नोटीस :—

बार्शी सेंट्रल को. बँक लि. ची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक २१ सप्टेंबर १९५२ रोजीं दुपारीं ४ वाजतां बँकेच्या साने मेमोरियल हॉलमध्यें भरेल. या सभेंत सन १९५१ ते ५२ सालचा वार्षिक अहवाल, ताळेबंद, नफावांटणी मंजूर करणें, पुढील सालासाठीं डायरेक्टर्स चेअरमन, व्हाईस चेअरमन निवडणें, हिशेब तपासनिसांच्या तपासणी यादीचा विचार करणें, लोकल ऑडिटर नेमणें वगैरे बँकेच्या नोटीसबोर्डावर प्रसिद्ध केलेल्या विषयांचा विचार करणें वगैरे कामें होतील व त्याच दिवशीं सदर ठिकाणीं सकाळीं ८ ते १२ वाजेपर्यंत व्यक्तिमात्र डायरेक्टरांची व १० ते १२ वाजेपर्यंत सोसायट्यांतर्फेचे डायरेक्टरांची निवडणूक होईल. तरी सदर निवडणुकीस व सभेस सभासदांनीं अगत्य यावें अशी विनंती आहे.

बार्शी
दि. २२ ऑ. १९५२

भा. वि. विश्वरूपे.
चेअरमन,
बार्शी सेंट्रल को. बँक लिमिटेड, बार्शी



**१९५२ मूल्यमापनाचें वर्ष १९५२**

## दि सेन्ट्रल म्युच्युअल लाईफ इन्शुअरन्स कंपनी लि.

**पहिल्या मूल्यमापनांत कंपनीनें बोनस जाहीर केलें आहे. येत्या मूल्यमापनांतील बोनसचे भागीदार होण्यासाठीं, आजच पॉलिसी घ्या.**

**सर्वत्र एजन्सीज देणें आहेत.**

६७ अपोलो स्ट्रीट,
फोर्ट, मुंबई.

शं. न. आगाशे
मॅनेजिंग डायरेक्टर



## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

— पुणें शहर —

लक्ष्मी रोड

पोस्ट बॉक्स नं. ५११ ] [ टेलिफोन नं. २४८३

मोर, पौड व वडगांव (मावळ) येथें बँकेनें आपल्या नवीन शाखा-कचेऱ्या उघडल्या आहेत. येथें व इतर शाखांतही सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार व सहकारी सोसायट्यांना शेतीसाठीं कर्जे देणें, सोनें-चांदीचे तारणावर कर्जे देणें, वगैरे व्यवहार सुरू केले आहेत.

चालू, सेव्हिंग्ज ठेवी स्वीकारल्या जातात.

अेक ते दहा वर्षें मुदतीच्या ठेवीही स्वीकारल्या जातात.

१ वर्ष २ टक्के, २ वर्षे २॥ टक्के, ५ वर्षे ३ टक्के, ७ वर्षे ३॥ टक्के, १० वर्षे ४ टक्के. याशिवाय रुपये २५,००० अगर पुढील रकमा ३ ते ९ महिने मुदतीनें घेण्यांत येतात.

दराबद्दल समक्ष चौकशी करावी.

वरीलप्रमाणें सर्व व्यवहार पुणें येथें मुख्य कचेरींत व इतर शाखांमध्यें होत असून त्याखेरीज पुणें येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टस व सेफ कस्टडीची सोय आहे. त्याचा फायदा खातेदारांनीं घ्यावा.

जास्त माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. खडे,
मॅनेजिंग डायरेक्टर.



स्थापना १९३६

## युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

*पॅलेस स्ट्रीट, सातारा.*

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.

ता. ३०-६-५१ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,४३,७६० |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,६५,००० |
| ठेवी | रु. | ६७,११,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ७९,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षे | तीन अगर अधिक वर्षे |
|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-११-० | ३ रुपये |

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | „ | २-०-० |
| चालू डिपॉझिट | „ | ०-८-० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी., बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
एस. एच. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन



## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर ( बेलापूर रोड ), ओझर ( जि. नाशिक ) खोपोली ( जि. कुलाबा )

श्री. बी. बी. वाळवेकर ( अध्यक्ष ) ||| श्री. के. पी. जोशी ( उपाध्यक्ष )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १५,४२,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. | ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. | ४,००,००० |

**एकूण खेळतें भांडवल ६० लाखांचे वर**

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
} मॅनेजिंग डायरेक्टर.



दि

## युनायटेड कमर्शिअल बँक लि.

कलकत्ता.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | ८ कोटी रु. |
| खपलेलें भांडवल | ... | ४ कोटी रु. |
| वसूल भांडवल | ... | २ कोटी रु. |
| रिझर्व्ह फंड | ... | ६७½ लक्ष रु. |

: बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :

जी. डी. बिर्ला ( चेअरमन )

| | |
|---|---|
| ईश्वरीप्रसाद गोएंका व्हाइस चेअरमन | रमणलाल जी. सरय्या व्हाइस चेअरमन |
| अनंत चरण लॉ | महादेव एल. डहाणूकर |
| बैजनाथ जालन | मदनमोहन आर. रुइया |
| गोविंदलाल बंगूर | मोहनलाल एल. शहा |
| पी. डी. हिमतसिंगका | मोतीलाल तापुरिया |
| रामेश्वरलाल नोपानी | नवीनचंद्र मफतलाल |

: जनरल मॅनेजर :

बी. टी. ठाकूर

भारत, बर्मा, पाकिस्तान आणि मलाया येथील महत्त्वाच्या शहरीं व गांवीं बँकेच्या शाखा असल्यानें आणि बँकेच्या सबंध जगभर एजन्सींच्या व्यवस्था असल्यानें भारतांत व भारताबाहेर अत्युत्कृष्ट बँकिंगची सेवा करण्यास बँक सुसज्ज आहे.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें